ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख ८ एप्रिल, १९५३ अंक १४

## विविध माहिती

**परकीय भांडवलाला परवानगी**—१५ ऑगस्ट, १९४७ पासून ३१ डिसेंबर, १९५२ पर्यंत भारतीय सरकारनें २१.६६ कोटी रुपये परकीय भांडवल उभारण्याची परवानगी दिली. हें भांडवल उभारण्याची परवानगी ६५ कंपन्यांनीं मिळून मागितली होती. एकूण भांडवलापैकीं १९.५५ कोटी रुपये भांडवल भारताबाहेर काम करणाऱ्या कंपन्यांनीं उभारलें होतें आणि २.०६ कोटी रुपये भांडवल भारतांत काम करणाऱ्या कंपन्यांनीं उभारलेलें होतें. ६५ परकीय कंपन्यांत ८ हिंदी कंपन्यांनीं आपलें भांडवल गुंतविलेलें आहे.

**अंतर्गत जलवहातुकीसाठीं बोर्ड**—द. भारतामधील अंतर्गत जलवहातुकीसाठीं एक बोर्ड स्थापन करण्याचा विचार भारतीय सरकार करीत आहे, असें समजतें. अशी वहातूक त्रावणकोर-कोचीन राज्यांत मोठ्या प्रमाणावर चालते. सध्या ह्या सरकारच्या भारतीय सरकारशीं वाटाघाटी चालू आहेत. बोर्डाच्या खर्चासाठीं दरवर्षी १ लाख रुपये वर्गणी देण्याचें त्रावणकोर-कोचिन सरकारनें कबूल केल्याचें समजतें.

**रशियांतील किंमती घटल्या**—जीवनावश्यक वस्तूंच्या किरकोळ विक्रीच्या किंमती रशिआंत १० ते १५ टक्क्यांनीं कमी करण्यांत आल्या आहेत. युद्ध संपल्यापासून किंमतींत करण्यांत आलेली ही चौथी कपात आहे.

**बिहारमधील पाणी पुरवठा**—बिहार राज्य-सरकारनें गया जिल्ह्यासाठीं एक पाटबंधाऱ्याची योजना आखली आहे. ह्या योजनेसाठीं ८ लाख रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. योजना पूर्ण झाल्यावर ९,००० एकर जमिनीला निश्चित पाणी पुरवठा होऊं लागून ६०,००० मण अधिक अन्नधान्य पिकेल असा अंदाज आहे.

**मध्य प्रदेशाची टाइपरायटर्सची खरेदी**—मध्य प्रदेश सरकार आपल्या कचेऱ्यांतून वापरण्यासाठीं ४,१५,००० रुपयांचे हिंदी व मराठी टाइपरायटर्स विकत घेणार आहे असें समजतें. आपल्या राज्य कारभारांत मराठी व हिंदी भाषांचा उपयोग करण्याचें ठरविल्यामुळें सरकारला ह्या टाइपरायटर्सची जरूरी भासूं लागली आहे.

**पोस्टाचीं सिलें करणारांची सहकारी संस्था**—पोस्ट व टेलिग्राफ खात्याला सिलें पुरविणाऱ्या कामगारांनीं आपली एक औद्योगिक सहकारी संस्था अलिपूर येथें स्थापन केली आहे. सध्या संस्थेंत ९५ सभासद आहेत. आतांपर्यंत हीं सिलें पुरविण्याचें काम दलालांमार्फत करण्यांत येत असे.

**चांदा येथील कागदाची गिरणी**—चांदाजवळ उभारण्यांत आलेली बल्लारपूर पेपर अँड स्ट्रॉबोर्ड मिल्स ही कागदाची गिरणी चालू महिन्यापासून प्रत्यक्ष उत्पादनाला प्रारंभ करणार आहे. ह्या गिरणींत कांहीं भांडवल सरकारचें असलें तरी ती मुख्यत: खाजगी भांडवलदारीची आहे. ह्या गिरणींत रोज २५ टन कागद तयार होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**ट्यूबवेल्ससाठीं वीज**—उत्तर प्रदेशांत शहाजहानपूर येथें १,८०० किलोवॅट वीज उत्पन्न करणारें एक वीज केंद्र नुकतेंच खोलण्यांत आलें. ह्या वीज केंद्रांतील वीज मुख्यत: ट्यूबवेल्समधील पाणी खेचण्यासाठीं पुरविण्यांत येणार आहे. शहाजहानपूरच्या आसपास ५०० ट्यूबवेल्स खोदण्यांत येणार असून त्यांपैकीं १६४ आजच पूर्ण झालेल्या आहेत.

**नाटकांवरील कर माफ**—मद्रास सरकारनें १२ मार्च, १९५१ रोजीं एक हुकूम काढून कांहीं नाटकांवरील करमणूक-कर रद्द केला होता. आतां ह्या हुकमाची मुदत आणखी एक वर्ष वाढविण्यांत आली आहे. ज्या नाट्यसंस्था सरकारमान्य व नोंद केलेल्या असतील व ज्या नफ्यासाठीं नाट्य-व्यवसाय न करतां नाट्यकला वृद्धिंगत करण्यासाठीं प्रयोग करीत असतील त्यांनाच करमाफीचा हुकूम लागू करण्यांत आला आहे.

**रशिया-हंगेरी व्यापारी करार**—रशिआ व हंगेरी ह्यांनीं परस्परांचा व्यापार वाढविण्यासाठीं एक करार केला आहे. हंगेरी-कडून बोटी, रेल्वेचीं इंजिनें, इत्यादि माल घेऊन रशिआ शेतीचीं अवजारें पुरविणार आहे. अशाच प्रकारचे आणखी कांहीं व्यापारी करार रशिआ पूर्व-युरोपांतील इतर राष्ट्रांशींहि करणार असल्याचें समजतें.

**प्रे. ऐसेनहोअर ह्यांना येणारीं पत्रें**—प्रे. ऐसेनहोअर ह्यांना दर आठवड्याला सरासरीनें २५,००० पत्रें येतात. ह्या पत्रांत देशांतील व परराष्ट्रीय बाबींसंबंधीं अनेक प्रकारचें मतप्रदर्शन करण्यांत आलेलें असतें. त्यांच्यामुळें प्रे. ऐसेनहोअर ह्यांना लोकमताची नाडी चांगलीच कळते. ह्या सर्वच पत्रांना ते स्वत: उत्तरें देतात, असें नाहीं. पण कांहीं पत्रांना ते व्यक्तिश: उत्तरें देतात, असें समजतें.

**मद्रास शहरांतील निराश्रित**—मद्रास शहरांत आसरा नसणारे सुमारें ७०,००० नागरिक असून त्यांना आपलें जीवन फुटपाथवर घालवावें लागतें. मद्रास कॉर्पोरेशन ह्या निराश्रितांना आसरा मिळवून देण्यासाठीं शक्य ती सर्व खटपट करीत आहे.

## करचौकशी समिति

देशांतील करपद्धतीची सर्वांगीण चौकशी करण्याचा प्रश्न भारत सरकारपुढें बराच काळ आहे. या बाबतींतील शेवटची चौकशी सुमारें ३० वर्षांपूर्वी इंडियन टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटीनें केली होती. तेव्हांपासून देशाच्या राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांत फार दूरगामी बदल झाले आहेत आणि देशाच्या सरकारी अर्थ-व्यवहाराची स्थिति १९२५ पेक्षां अगदीं वेगळी झाली आहे. गेलीं कांहीं वर्षे याबाबत फेरचौकशी व्हावी अशी सगळीकडून मागणी करण्यांत येत होती आणि तसें करण्यास १९४६ मध्येंच तत्वतः मान्यता देण्यांत आली होती. तरी, फाळणीबरोबर आलेले घटनात्मक बदल आणि इतर निकडीचे प्रश्न यांमुळें या निर्णयाच्या अंमलबजावणीस विलंब लागला.

### समितीचे अध्यक्ष व सभासद

डॉ. जॉन मथाई (अध्यक्ष), मुंबई राज्याचे माजी अर्थमंत्री श्री. वैकुंठ एल. मेहता, दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे डायरेक्टर डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव, मध्यवर्ती अर्थखात्याचे चिटणीस श्री. के. आर. के. मेनन, मुंबई येथील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर श्री. बी. व्यंकटप्पैय्या, आय. सी. एस., मुंबई येथील रिझर्व्ह बँकेचे आर्थिक सल्लागार डॉ. बी. के. मदन. दिल्ली येथील आर्तापर्यंतचे इनकमटॅक्स कमिशनर सरदार इंद्रजितसिंग हे या मंडळाचे चिटणीस म्हणून काम पाहतील. सदर मंडळाची मुख्य कचेरी मुंबई येथें राहील.

### कामाचे विषय

(१) निरनिराळ्या वर्गाच्या लोकांवर आणि निरनिराळ्या राज्यांत मध्यवर्ती, राज्य व स्थानिक संस्थांच्या पडणाऱ्या करभाराची चौकशी करणें.

२ (अ) देशाचा विकास व कार्यक्रम व त्यासाठीं लागणारी साधनें आणि (ब) उत्पन्न व संपत्ति यांमधील विषमता कमी करण्याचें ध्येय या गोष्टी विचारांत घेऊन मध्य, राज्य व स्थानिक कराच्या सध्यांच्या पद्धतीची योग्यायोग्यतां पाहणें.

(३) उत्पन्नावरील कराची पातळी आणि त्याचें स्वरूप यांचे परिणाम भांडवल उभारणी आणि उत्पादक धंद्यांचें संगोपन व विकास यांच्यावर काय होतील त्यांची पाहणी करणें.

(४) चलनवाढीच्या किंवा चलनतुटीच्या परिस्थितीस तोंड देण्याच्या दृष्टीनें आर्थिक शस्त्र म्हणून कराच्या उपयुक्ततेबाबत पाहणी करणें.

(५) इतर संबंधित गोष्टींचा विचार करणें. आणि

(६) विशेषतें (अ) सध्यांच्या करपद्धतींत अवश्य असलेल्या सुधारणा आणि (ब) कर बसविण्याचीं नवीं साधनें यांबाबत शिफारसी करणें.

---

### ब्रिटिश सरकारचा उत्पन्न-खर्च

३१ मार्च, १९५३ अखेर संपलेल्या वर्षी ब्रिटिश सरकारचें उत्पन्न ४४३·९ कोटी पौंड होऊन खर्च ४३५·१ कोटी पौंड झाला. मूळ अंदाजापेक्षा उत्पन्न २२·२ कोटी रु. कमी झालें व खर्च १२·० कोटी रुपये ज्यास्त झाला. ४३ कोटी रुपयांचा वाढावा उरेल अशी अपेक्षा होती; प्रत्यक्ष वाढावा ८·८ कोटी रु. राहिला. १४ एप्रिल रोजीं ब्रिटिश अर्थमंत्री नव्या वर्षाचें अंदाजपत्रक प्रकट करतील, तें ह्या आकड्यांच्या आधारावर केलेलें असेल.

## श्री. जोग (महाराष्ट्र बँक) ह्यांचा नवा सन्मान

### इंडियन बँक्स असोसिएशनच्या कमिटीवर नियुक्ति

सोमवार, दि. ३० मार्च रोजीं इंडियन बँक्स असोसिएशनची सहावी वार्षिक सभा झाली. त्या वेळीं शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांची असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून पुनः, पांचव्यांदा, निवडणूक झाली. सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे श्री कॅप्टन, हे उपाध्यक्ष व कॅनरा बँकेचे श्री. नायक हे ऑनररी सेक्रेटरी झाले. कमिटीचे इतर सभासद खालीलप्रमाणें आहेतः—

श्री. ए. सी. क्लार्क (बँक ऑफ इंडिया), श्री. मॅथ्यू डिसूझा (बँक ऑफ बरोडा), श्री. आर. जी. सरय्या (युनायटेड क. बँक), श्री. एम. एस. कॅप्टन (युनियन बँक ऑफ इंडिया), श्री. एस. पी. जैन (पंजाब नॅ. बँक), श्री. एस. कृष्णस्वामी अय्यंगार (इंडियन बँक), श्री. संजीवन बानर्जी, (युनायटेड बँक ऑफ इंडिया), श्री. एस. एल. कोठारी (बँक ऑफ जयपूर) आणि श्री. सी. व्ही. जोग (बँक ऑफ महाराष्ट्र)

### महाराष्ट्रीय बँकांना संधि

इंडियन बँक्स असोसिएशनच्या १९५३-५४ सालच्या मॅनेजिंग कमिटीवर श्री. सी. व्ही. जोग (बँक ऑफ महाराष्ट्र) ह्यांची योजना झाली आहे; ह्याबद्दल आम्हीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. श्री. जोग ह्यांच्या वैयक्तिक कीर्तीत त्यामुळें भर पडली आहे व त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा भारतांतील सर्व बँकांच्या केंद्रीय संस्थेस मिळणार आहे. महाराष्ट्र बँकेसहि अखिल भारतीय बँकिंग क्षेत्रांत त्यामुळें उच्च दर्जा प्राप्त झाला आहे. महाराष्ट्रांतील सर्वच बँकांना श्री. जोग ह्यांची नियुक्ति स्वागतार्ह वाटेल; कारण त्यांना त्यांचे प्रश्न मोक्याच्या ठिकाणीं मांडण्यास त्यामुळें चांगली संधी मिळाली आहे.

---

### बंगाल चेंबरला १०,००० पुस्तकांची देणगी

कै. नलिनिरंजन सरकार ह्यांच्या ग्रंथालयांतील व्यापार-उद्योग विषयक ग्रंथ व मासिकें मिळून सुमारें १०,००० पुस्तकें बंगाल चेंबर ऑफ कॉमर्सला देणगी म्हणून देण्यांत आलीं आहेत.

### हिंदी कोळशाचें मोठें गिऱ्हाइक

भारतांतील कोळशाच्या एकूण उत्पादनापैकीं एक तृतीयांश उत्पादन हिंदी रेल्वेजनाच लागतें.

### घाटांच्या दुरुस्तीसाठीं ५ कोटी रु लागणार

काशी येथील गंगेचे पडीक घाट दुरुस्त करण्यास ५ कोटी रुपये खर्च येईल, असा उत्तर प्रदेशाच्या इंजिनिअरांचा अंदाज आहे. ह्या खर्चासाठीं मध्यवर्ती सरकारकडून मदत मागण्यांत आली आहे.

---

**तुरुंगांतील कैद्यांसाठीं खादी**—उत्तर-प्रदेशांतील तुरुंगांत असणाऱ्या कैद्यांना खादीचे कपडे देण्याचें ठरलें आहे असें समजतें. मीरत येथील गांधी-आश्रमाकडे १,४०,००० रुपये किंमतीची खादी पुरविण्यासाठीं मागणी करण्यांत आली आहे. रुपयामागे तीन आणे कमिशन देण्याचें आश्रमानें जाहीर केलेलें असल्यामुळें सरकारचाहि फायदा होईल.

**सहकारी शिक्षणाचें कॉलेज**—मध्यभारत सहकारी परिषदेचें अधिवेशन ग्वाल्हेर येथें भरविण्यांत आलें होतें. सहकारी चळवळीचें मार्गदर्शन करण्यासाठीं कार्यकर्त्यांना शिक्षण देणारें एक कॉलेज काढण्याचा निर्णय परिषदेंत घेण्यांत आला.

# अर्थ

बुधवार, ता. ८ एप्रिल, १९५३



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## घसारा काढण्याचें धोरण सुधारलें पाहिजे

घसरा किती काढावा, हा प्रश्न कंपन्यांचा कारभार निर्दोष चालविण्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आहे. कोणत्याहि ठराविक मुदतींत मालमत्तेची व जिंदगीची किंमत कोणत्याहि कारणानें जी कमी होते, तिला घसारा म्हणतां येईल. झिज, जीर्णत्व, अपुरेपणा व निरुपयोगीपणा, ह्या सर्वांचा घसाऱ्यामध्यें समावेश होतो. कालांतरानें जिंदगीची किंमत कमी होते व जिंदगी उपयुक्ततेच्या दृष्टीनें नष्टहि होते त्याची तरतूद घासरा काढून करावी लागते. झिजेमुळें होणाऱ्या घसाऱ्याचा अगाऊ अंदाज बांधणें शक्य होतें आणि "अहवालाच्या वर्षासाठी घसारा" ह्यांत त्या मुदतींत जिंदगीच्या झालेल्या झीजेचें पैशांत मोजमाप केलेलें असतें. जिंदगी कांहीं काळानंतर निरुपयोगी होते, त्याचा अगाऊ अंदाज करतां येणें कठीण असतें. जिंदगीच्या उपयोगानें होणाऱ्या उत्पन्नांतून घसाऱ्याचें नुकसान वजा घातल्यावर खरा नफा निघूं शकतो. तसें केलें नाहीं, तर नफा-तोटा पत्रक खरा नफा दाखविणार नाहीं आणि ताळेबंद वस्तुस्थितिनिदर्शक होणार नाहीं. कारण, झीज झाली तरी जिंदगी मूळ किंमतीसच कायम राहिल्यासारखें त्यामुळें होईल.

सध्या जो घसारा काढला जातो तो जीर्ण किंवा निरुपयोगी होणाऱ्या जिंदगीची जागा भरून काढण्यास पुरेसा होतो काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. किंमती वाढत गेल्या आहेत आणि तोच जिन्नस बदलावयाचा असल्यास तिप्पट, चौपट खर्च पडूं लागला आहे. तेव्हां, मूळ किंमत भरून काढण्यासाठी काढलेल्या घसाऱ्यांतून नवा जिन्नस नव्या किंमतीस विकत घेतां येणें अशक्य आहे. केवळ किंमतीच वाढतात असें नव्हे, तर यांत्रिक सुधारणाहि होत जातात आणि त्यांचा फायदा घेण्यास सध्या काढण्यांत येणारा घसारा पुरा पडणें अशक्य आहे. एक स्वतंत्र जनरल कॉन्टिन्जन्सी रिझर्व्ह फंड त्यासाठीं निर्माण करतां येईल.

ह्या महत्त्वाच्या गोष्टी बाजूस ठेवल्या, तरी नित्य झीज होऊन निर्माण होणाऱ्या घसाऱ्याची तरतूद करणारें कोणतेंहि बंधन कंपनी कायद्यानें घातलेलें नाहीं, ही एक मोठीच उणीव आहे. टेबल ए मध्यें १०७ व्या रेग्युलेशनमध्यें नफा-तोटा पत्रकांत काय असावें हें सांगितलें आहे, त्यांत घसारा काढलाच पाहिजे असें म्हटलेलें नाहीं. मॅनेजिंग एजंटांना द्यावयाचा मोबदला कसा ठरवावा, हें सांगणाऱ्या ८३ सी (३) कलमांत घसाऱ्याचा उल्लेख आहे, परंतु हा घसारा कसा काढावयाचा हें स्पष्ट नाहीं; डायरेक्टरांच्या अधिकारांतला तो प्रश्न आहे.

कित्येक कंपन्या नफा काढण्यापूर्वी घसारा हिशेबांत घेतच नाहींत. वास्तविक, नफ्यांतून तरतूद करण्याची ती बाब नाहीं, तर ती खर्चाची एक महत्त्वाची बाब आहे; घसारा काढल्याविना नफा येऊंच शकत नाहीं. नफा झाला, तरच त्यांतून शक्य व सोईस्कर वाटेल तेवढा घसारा काढावयाचा; त्याला चालू आवश्यक खर्च म्हणून मानावयाचें नाहीं, असें कांहीं ठिकाणीं आढळतें. नफा झाला नाहीं, तर घसारा न काढतां तो तसाच साठूं द्यावयाचा व पुरेसा नफा जेव्हां होईल तेव्हां त्यांतून तो काढावयाचा, असें धोरण असतें. ह्या उलट, चांगल्या व्यवस्थेखालील कंपन्या जरूर तो घसारा अवश्यमेव काढतात; मग नफा होवो वा तोट्यांत भर पडो.

नफ्याचा घसाऱ्याशीं संबंध जोडणें अगदींच चुकीचें आहे. नुकसान झालें तरी घसारा काढला, तर घसारा तुंबून रहाण्याचें कारणच पडणार नाहीं. चांगल्या, दूरदर्शी व्यवस्थेखालील कंपन्या जरूरीपेक्षा ज्यास्त घसाऱ्याची तरतूद करतात. त्यामुळें, मोठाले गुप्त रिझर्व्ह निर्माण होण्यास मदत होते. इन्कम टॅक्ससाठीं जेवढा घसारा मान्य केला जातो, त्याहिपेक्षा ज्यास्त घसारा काढणाऱ्या कंपन्या आहेत.

नफ्यांतून म्हणजे नफा झाला तरच, शक्य होईल तेवढा घसारा, कोणत्याहि तत्त्वाचा आधार न घेतां काढणाऱ्या कंपन्याच ज्यास्त. घसारा हा रात्रंदिवस चालू असतो, तो वर्षानुवर्ष चालू राहतो; तेजी किंवा मंदी तो जाणीत नाहीं. म्हणून घसारा हा उत्पन्नांतून प्रथम बाहेर काढूनच नफा-तोटा किती होतो तें पहाणें इष्ट होय. ह्या मामुली घसाऱ्याबरोबर, यंत्रसामुग्री इत्यादि नव्या शोधांमुळें निरुपयोगी होण्याचीहि तरतूद करणें योग्य होय. अर्थात्, त्याचा नीटसा अंदाज करतां येणें अशक्य आहे.

सध्यां किंमती वाढलेल्या असल्यामुळें केवळ झिजेची तरतूद करणारा घसारा अगदींच अपुरा ठरत आहे. जेव्हां कंपन्यांना चढत्या बाजारभावामुळें भरमसाट नफे होत होते, तेव्हांच चढीच्या किंमतीमुळें कंपनींची यंत्रसामुग्री नवी करण्यास येणाऱ्या खर्चाची तरतूद करून ठेवावयास हवी होती. परंतु, कित्येक कंपन्यांनीं तसें केलेलें नाहीं. १९४९–५० अखेर १०० ते १५० कोटी रुपये घसारा काढण्याचा तुंबलेला होता; ह्यावरून प्रस्तुत प्रश्नाचें स्वरूप लक्षांत येईल.

कांहीं मोठ्या कंपन्यांनीं घसाऱ्याची पुरेशी तरतूद न केल्यामुळें त्यांच्या वाढीस व किफायतशीरपणास बाधक अशी त्यांची आर्थिक परिस्थिति झाली; खरा नफा झालेला नसतांना तो वाटून व उपभोगून टाकला गेला व आतां यंत्रांच्या खरेदीस व आधुनिकीकरणास त्यांच्या स्वतःजवळ पैसा नाहीं व बाजारांतहि उभारतां येत नाहीं, अशी अडचणीची परिस्थिति निर्माण झाली. कांहीं कंपन्यांची घसारा काढण्याजोगी स्थितीच नव्हती व त्यामुळें किती तरी घसारा काढण्याचा तुंबून राहिला आहे. घसारा अजिबात न काढतांच नफा दाखवून डिव्हिडंड वाटणें व कंपनी फायदेशीर आहे असें ठेवीदारांना व भागीदारांना दाखविणें त्यांना गत्यंतर झालें. त्यामुळें, त्यांच्याजवळील रोकड रकमेची स्थिति ज्यास्तच विकट झाली. एकदां नफा दाखविल्यावर व वाटल्यावर ती स्थिति सालोसाल कायम राखण्याची आवश्यकता निर्माण होते व घसाऱ्याकडे दुर्लक्ष होतें.

घसारा काढण्याची कायद्यानें सक्ति केलेली नाहीं. तथापि, घसारा हा नफ्याचे अगोदर काढावयाचा 'चार्ज' आहे, नफा वाटणीचा तो भाग नाहीं हें कंपन्यांच्या चालकांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. किती घसारा काढला पाहिजे, ह्याचा हिशेब नफ्याचे रकमेवर अवलंबून ठेवता कामा नये. घसाऱ्याबरोबर, यंत्रसामुग्री झिजली नाहीं तरी तीं जुनी-पुराणी व निरुपयोगी होईल हें लक्षांत घेऊन त्याचीहि तरतूद केली पाहिजे. कंपनीचें स्थैर्य व अंतिम हित ह्यांस व्यक्तींच्या तात्कालिक फायद्यापेक्षा ज्यास्त महत्त्व दिलें जाणें अगत्याचें आहे.

---

## प्राप्तीवरील कर कोण, किती देतो ?

एक लाख रुपयांवर उत्पन्न असलेल्या करपात्र इसमांची १९५१-५२ मधील संख्या केवळ ४,७३७ होती. हा आंकडा एकूण लोकसंख्येच्या ·००१३ टक्के असला तरी त्यांपासून या वर्षांत एकूण आकारण्यांत आलेल्या १९५·८ कोटी रुपये कराच्या जवळजवळ ६३·५ टक्के उत्पन्न आलें आहे. २५,००० ते १,००,००० रु. व १०,००० ते २५,००० रुपये उत्पन्न असलेल्या करपात्र इसमांचें प्रमाण अनुक्रमें २१·५ व सुमारें ९·५ टक्के होतें. तथापि, बहुसंख्य करपात्र इसमांचें (५,१०,४१२) उत्पन्न १०,००० रुपयांहून कमी होतें व त्यापासून केवळ ५·५ टक्के उत्पन्न आलें.

या वर्षांत प्रत्यक्ष करआकारणी झालेल्या ६,४७,३७६ प्रकरणांपैकीं ५,४७,५३९ व्यक्ती, ६५,७५० अविभाज्य हिंदू कुटुंबें, २३,३२६ नोंदणी न झालेल्या फर्म्स व इतर संस्था आणि १०,७६१ कंपन्या होत्या. १९५०-५१ मध्यें हेच आंकडे अनुक्रमें ४,७२,४१९, ३,९५,०१७, ५२,४०१, १६,४८२ व ८,५१९ असे आहेत.

१९५१-५२ मध्यें एकूण ७८२·९ कोटी रु. उत्पन्नावर करआकारणी झाली; त्यामागील वर्षाचा आंकडा ५७४·६ कोटी रुपये होता.

### करआकारणी झालेल्या उत्पन्नाचे प्रकार

पगारावर कर आकारणी केलेल्या करपात्र इसमांचा आंकडा १९५०-५१ मधील-२,११,५०८ वरून १९५१-५२ मध्यें २,८०,२८८ वर गेला. यांत सरकारी व बिनसरकारी लोकांची संख्या अनुक्रमें ९८,०१८ व १,८२,२७० अशी आहे. त्यामागील वर्षाचे हे आंकडे अनुक्रमें ८४,०५९ व १,२७,४४९ असे आहेत. १९५१-५२ मध्यें एकूण १७८·४ कोटी रु. पगाराच्या उत्पन्नावर कर आकारण्यांत आला, तर त्यामागील वर्षांतील हा आंकडा १२५·९ कोटी रुपये होता.

१९५१-५२ मध्यें एकण ३०·२ कोटी रु. उत्पन्न असलेल्या जिंदगीदारांची संख्या १,८७,४४१ होती व त्यांचे उत्पन्नावर कर म्हणून ६·१ कोटी रुपयांची आकारणी करण्यांत आली. त्यामागील वर्षाचे हेच आंकडे अनुक्रमें २२·८ कोटी रु. उत्पन्न, १,४१,२२१ व्यक्ती आणि ४·९ कोटी रु. आकारलेली रक्कम असे होते.

या वर्षांत करआकारणी केलेल्या व्यक्तींपैकीं व्यापार आणि व्यवसाय यांपासून उत्पन्न मिळालेल्यांची संख्या ३,६८,८६८ होती. १९५०-५१ मध्यें हीच संख्या २,५२,७७९ होती. करआकारणी केलेल्या उत्पन्नाच्या रकमा अनुक्रमें ४५५·९ कोटी रु. व ३३७·७ कोटी रु. असून प्रत्यक्ष आकारलेल्या कराच्या रकमा अनुक्रमें १३२·६ कोटी रु. व १०४·९ कोटी रु. अशा होत्या. त्यांपैकीं अवघ्या २१,३४८ व्यक्तीच निरनिराळ्या व्यवसायांत होत्या आणि बाकीच्या सर्व व्यापारपेशांत गुंतलेल्या होत्या.

१९५०-५१ मध्यें नफ्यापासून (डिव्हिडंड) उत्पन्न मिळणाऱ्या व्यक्तींची संख्या ९५,९५१ होती ती पुनर्विलोकनाच्या वर्षांत वाढून १,१८,५०७ झाली. करआकारणीसाठी अंतर्भूत केलेलें नफ्यावरील उत्पन्न या वर्षांत ५२·३ कोटी रु. होतें. त्यामागील वर्षांत हीच रकम ३८·२ कोटी रु. होती. शेअरहोल्डर्सचे वतीनें भरणा केलेल्या प्राप्तीकराची रकम १९५१-५२ मध्यें १३·४ कोटी रु. असावी. १९५०-५१ मधील हीच रकम १०·१ कोटी रुपये होती.

१९५१-५२ मध्यें करआकारणीसाठी धरलेल्या परदेशांत मिळविलेल्या उत्पन्नाची रकम ३९·३ कोटी रु. होती. अशा प्रकारच्या उत्पन्नावर आकारलेल्या कराची रकम ३·७ कोटी रु. आणि सुपर टॅक्सची रकम ३·४ कोटी रु. होती.

### रिफंड व रिबेट

रिफंड आणि रिबेट देणाऱ्या प्रमुख बाबी म्हणजे दुहेरी करआकारणीपासून सूट, नुकसानी, आकारणींत कपात, पाकिस्तानांत मिळालेलें उत्पन्न, वांटप न केलेल्या नफ्याच्या रकमा, प्रॉव्हिडंड फंड, विम्याचे हप्ते आणि धर्मादाय देणग्या या होत.

करासाठीं विचारांत घेऊन उत्पन्नाच्या मूळ ठिकाणीं कापून घेतलेली अगर भरणा केलेली रकम १९५१-५२ मध्यें प्राप्तीकर म्हणून २,९९९ लक्ष रुपये व सुपर टॅक्स म्हणून ३५३ लक्ष रुपये होती. त्यामागील वर्षांत याच रकमा अनुक्रमें २,३१९ लक्ष रुपये व २७५ लक्ष रुपये अशा होत्या. या वर्षांत करआकारणी केलेल्या पगाराच्या रकमेंत खाजगी मालकांनीं दिलेल्या पगारांची रकम सर्व सरकारी पगाराच्या रकमेपेक्षा दुप्पट होती.

कांहीं उत्पन्नाच्या रकमा कराचा दर निश्चित करण्यासाठीं एकूण उत्पन्नांत घेतलेल्या असतात, आणि त्यावरील रिबेट सरासरी दरानें देण्यांत येतें अशी वस्तुस्थिति असते. १९५१-५२ मध्यें करआकारणींत अशा उत्पन्नाची एकूण बेरीज २३७ लक्ष रुपये असून, त्यापैकीं नफ्याचे १२८ लक्ष रु. आणि रोख्यांवरील व्याजाचे १०४ लक्ष रु. आहेत. या वर्षांत रिबेट दिलेली एकूण रकम ५८ लक्ष रुपये असून १९५०-५१ मध्यें ती ८५ लक्ष रुपये होती.




## राज्यारोहण प्रसंगीं भारतीय प्रदर्शन

इंग्लंडची राणी दुसरी एलिझाबेथ हिच्या राज्यारोहणप्रसंगीं भारतीय औद्योगिक आणि ग्रामोद्योगीय वस्तूंचें एक प्रदर्शन लंडन येथें भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनाच्या संघटनेचें काम भारत सरकारनें स्वतःच आपल्या अंगावर घेतलें असून तें मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत खुलें करण्यांत येणार आहे असें समजतें. मोठमोठ्या उद्योगधंद्यांत तयार होणाऱ्या व निर्यात करतां येण्यासारख्या मालाचे नमुने, कच्चा माल आणि शेतीचा माल ह्या वस्तू इंडिआ हौसमध्यें प्रदर्शनार्थ मांडण्यांत येणार आहेत. छोटेखानी उद्योगधंदे आणि ग्रामोद्योगांत तयार झालेल्या वस्तू ह्यांच्या प्रदर्शनासाठी वेगळी इमारत ठेवण्यांत आली आहे. लंडनमधील सुप्रसिद्ध ट्राफल्गार चौकापासून थोड्याशा अंतरावर कॉक्सपरस्ट्रीट नांवाची एक सडक आहे. ह्या सडकेवर एका चार मजली इमारतींत वरील वस्तू मांडण्यांत येणार आहेत. ही इमारत भारतीय सरकारनें प्रदर्शनापुरतीच भाड्यानें घेतली आहे. कॅनडामधील टोरोंटो ह्या शहरीं ता. १ जूनपासून एक इंटरनॅशनल ट्रेड फेअर भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांतहि भाग घेण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. हें प्रदर्शन १५ दिवसपर्यंत खुलें रहाणार आहे. इंग्लंड अगर कॅनडासारख्या प्रगत देशांत भारतासारख्या मागासलेल्या देशानें औद्योगिक प्रदर्शनें भरविणें फारसें इष्ट होणार नाहीं असें सकृद्दर्शनी वाटण्याचा संभव आहे. पण भारतासंबंधीं पाश्चात्य देशांत अजूनहि जें अज्ञान आहे तें अंशतः दूर करण्याच्या कामीं अशीं प्रदर्शनें थोडाफार हातभार लावूं शकतील ह्यांत शंका नाहीं. राज्यारोहणप्रसंगीं जगांतील बहुसंख्य देशांचे लोक लंडनला गर्दी करतील. त्यांच्यासमोर भारतीय उद्योगधंद्यांतील मालाचें प्रदर्शन भरविण्याची कल्पना फारच योग्य आहे.

## युनायटेड बँक ऑफ इंडिया लि.


बंगालमधील चार मोठ्या बँकांचें एकत्रीकरण १९५० मध्यें होऊन त्यांतून निर्माण झालेल्या युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. ला. १९५२ मध्यें २०,२०,९८६ रु. नफा झाला. भागीदारांना ३% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ७,९५,६२६ रु. चा विनियोग करण्यांत येणार आहे. कलकत्ता शहरांत बँकेच्या २० शाखा असून पश्चिम बंगालमध्यें २०, आसाम व त्रिपुरांत १२, बिहार व ओरिसांत १०, उत्तर प्रदेशांत ६, मुंबई शहरांत १, मद्रास शहरांत १ आणि पूर्व पाकिस्तानांत १४, अशा शाखा आहेत. १३ देशांत तिच्या "एजंटस् व कॉरसपॉंडंटस्" बँका आहेत.

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,६९,२७,८५२ | कॅश, बँकांत | ३,९०,७२,९३८ |
| रिझर्व्ह,इतर फंड | १,०३,००,००० | इन्व्हेस्टमेंटस् | १३,१२,१२,८६३ |
| ठेवी | २६,६६,२४,०७१ | कर्जे | १३,२४,५५,१६९ |

## मध्यभारत सरकारची बचत योजना

मध्यभारत सरकार येत्या तीन वर्षांत बचत योजनांच्या द्वारां ४½ कोटी रुपये उभे करण्याची उमेद बाळगून आहे. ७५ रु. वरील पगारदार सरकारी नोकरांवर एका महिन्याचा पगार बचत म्हणून सरकार-स्वाधीन करण्याची सक्ति केली जाईल. बचतीचे इतरहि कांहीं मार्ग अवलंबिले जातील. चंबळ नदी योजनेसाठी मध्यभारत व राजस्थान ह्यांनीं मिळून १० कोटी रु. उभारण्याचें मान्य केलें आहे. मध्यभारत सरकारची बचत योजना यशस्वी झाली, तर त्याला त्यासाठी वेगळें कर्ज उभारावें लागणार नाहीं.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE
HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

## भारतामधील पोलादाचें उत्पादन

मध्यप्रदेशांत लोखंड–पोलादाचा एक सरकारी कारखाना काढण्याचा भारतीय सरकार विचार करीत होतें. मध्यप्रदेश सरकारचे कांहीं अधिकारी ह्यासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं नुकतेच दिल्लीला गेले होते. हा संकल्पित कारखाना मध्यप्रदेशांतच काढणें कसें सोईचें आहे तें त्यांनीं भारतीय सरकारला पटवून देण्याचा प्रयत्न केला. ह्यापूर्वी भारतीय सरकारच्या तंत्रज्ञांचें एक मंडळ नागपूरला येऊन गेलें होतें. त्यावेळीं मंडळानें मध्य प्रदेश सरकारचे मुख्य मंत्री श्री. रविशंकर शुक्ला ह्यांच्याशीं चर्चा केली होती. परंतु ह्या संबंधींच्या तज्ज्ञांचें मत मध्यप्रदेशांत नवा कारखाना काढण्यास फारसें अनुकूल नाहीं असें समजतें. ज्या कारखान्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत त्या कारखान्यांत सहा वर्षांत क्रमाक्रमानें ८० कोटी रुपये गुंतविण्यांत यावयाचे आहेत. कारखान्यांत दरवर्षी सुमारे ८ लाख टन बिडाचें लोखंड आणि ३·५ लाख टन पक्कें पोलाद तयार होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. पण आतां ह्या नव्या कारखान्याचें भवितव्यच शंकित झालें आहे असें दिसतें. भारताला आपलें अवजड उद्योगधंदे वाढविणें अतिशय जरूर आहे. पण ते कोणत्या मार्गानें वाढवावे ह्याबद्दल मतभेद झालेले आहेत. मध्यंतरीं कांहीं जपानी कारखानदारांच्या मदतीनें लोखंड–पोलादाचें उत्पादन वाढविण्याचें घाटत होतें पण ह्या वाटाघाटींतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. नवा कारखाना काढण्यापेक्षां सध्या चालू असलेल्या एखाद्या कारखानदारालाच उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक ती मदत करावी असें तज्ज्ञांचें मत आहे. ह्या दृष्टीनें सिंद्री येथें एक लोखंडाचा कारखाना काढण्यास ते अनुकूल आहेत. अर्थात्, जुने कारखाने अधिक वाढविण्यानें विकेंद्रीकरण होण्याऐवजी केंद्रीकरण मात्र होत जाईल.

## सहकारी सोसायट्यांना भागीदारी करतां येणार

बॉंबे को. सोसायटीज ॲक्टांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे. सहकारी सोसायट्यांचें एकत्रीकरण (अमलगमेशन) त्यामुळें करतां येईल. त्याचप्रमाणें, विशिष्ट कामासाठी त्यांना भागीदारीहि करतां येईल.

## गूळ उत्पादनाचें बक्षीस

१९५२–५३ मध्यें गूळ उत्पादनाचा उच्चांक गाठल्याबद्दल महाराष्ट्र विभागांतील श्री. कृ. म. भोंगळे (बारामती) व श्री. एच. एच. कुंभार (अकलूज) ह्यांना अनुक्रमें १,००० रु. व ५०० रु. बक्षीस मुंबई सरकारनें दिलें. श्री. भोंगळे ह्यांनीं प्रत्येक एकरीं २०८ मण, २० शेर गूळ उत्पादन करून दाखवला.

## हैद्राबाद सरकारची बँकर

हैद्राबाद सरकारची एकमेव बँकर म्हणून रिझर्व्ह बँक, एप्रिल १९५३ पासून काम करूं लागली आहे.

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव

दि बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव या बँकेच्या भागीदारांची १९ वी वार्षिक सभा २९ मार्च रोजीं सायंकाळीं ४ वाजतां बँकेच्या मुख्य कचेरींत भरली होती. श्री. जी. डी. सराफ यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें व सभेचे कामास सुरवात झाली.

प्रारंभीं श्री. एम. एस. होसमनी यांनीं बँकेबद्दल चार शब्द सांगितल्यावर श्री. जी. डी. सराफ यांचें भाषण सुरू झालें.

डायरेक्टर्स व ऑडिटर्स यांच्या रिपोर्टासह ताळेबंद व नफातोटा पत्रक पास झाल्यावर भागीदारांना ४ टक्के करमाफ डिव्हिडंड देण्याचा ठराव पास झाला. श्री. जी. डी. सराफ, ए. ए. मंडुकवाला, बी. व्ही. संबरगी यांची पुन्हां डायरेक्टर म्हणून निवडणूक झाली.

शेवटीं बेळगांव डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँकेचे चेअरमन श्री. पी. बी. उगरगोळ यांचें भाषण झाल्यानंतर अल्पोपहार होऊन सभा बरखास्त झाली.

ताबडतोब बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सभा देऊन श्री. जी. डी. सराफ हे १९५३–५४ सालासाठी बँकेचे चेअरमन झाल्याचें जाहीर करण्यांत आलें.

### बँकेचे चेअरमन, श्री. जी. डी. सराफ ह्यांचें भाषण

"बँकिंग कंपनीज ॲक्ट १९४९ च्या कायद्यान्वयें एकूण ठेवींच्या ⅕ एवढी रकम रोखींत ठेवली पाहिजे असें आहे. त्याप्रमाणें ठराविक रकमेपेक्षाहि जास्त रोखींत शिल्लक राखली असून यामुळें भागीदारांची व ठेवीदारांची सुरक्षितता ही बँक प्रामुख्यानें पहाते ही गोष्ट आपण सर्वांनीं विशेष ध्यानांत ठेवावी. गेल्या वर्षी घाऊक किंमतीचा आंकडा ४१२ वरून ३८७ वरती स्थगित झाला होता व व्यवहारांतील सेळता पैसा गेल्या वर्षी जवळ जवळ १०० कोटींनीं कमी झालेला होता, त्यामुळें गेल्या वर्षी नाणेबाजारांत पैशाचा फारच तुटवडा होऊन किंमती फारच खालीं आल्या व पैशाची तीव्र टंचाई भासूं लागली होती. परंतु अशाही कठीण परिस्थितींत बँकेनें व्यापारी वर्गास मदत केली. बँकेचे सर्व व्यवहार सुरळीत चाललेले असून सर्व व्यापाऱ्यांना या बँकेचा जास्तींत जास्त फायदा होत आहे.

### डेफिसिट फायनान्स

"गेल्या महिन्यांत बहुतेक प्रांतिक व मध्यवर्ती सरकारचें आर्थिक धोरण दर्शविणारीं अंदाजपत्रकें जाहीर करण्यांत आलीं. मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक तुटीचें आहे, व या वर्षी पंचवार्षिक योजना पूर्ण करण्याकरितां लागणारा पैसा, तो कर्ज व कर यांमधून भरून येणें शक्य नसल्यानें डेफिसिट फायनान्सनें (नोटा छापून) भरून काढण्याचें सरकारी धोरण जाहीर झालेलें आहे. या धोरणाचा परिणाम आपल्या आर्थिक व्यवहारावर काय होईल अशी विचारणा केली जाते. सरकारी नियंत्रणामुळें जरी किंमती फार नाहीं तरी थोड्या तरी वाढणार हें खचित. तरी होता होईल तों अन्नधान्य यांची साठेबाजी न करतां व औद्योगिक उत्पादन वाढवून, कर्ज विकत घेऊन ही पंचवार्षिक योजना यशस्वी केली गेली पाहिजे. त्यामुळें आपल्या उत्पादनशक्तीमध्यें वाढ होईल. उत्पादन वाढ म्हणजे उत्पन्न वाढ म्हणजे बचत वाढ व बचत वाढ म्हणजे बँकांमधील ठेवींची वाढ होय.

### बँकांचें चलन व्यवहारांत आणण्याचें सामर्थ्य

"आपला देश इतका अफाट आहे कीं, त्यांतील आपलें बँकिंग–क्षेत्रांतील स्थान अजूनही फार मागासलेलें आहे. त्याचें एक प्रत्यंतर म्हणजे रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या व व्यवहारांत असलेल्या एकंदर ११०० कोटी रु. च्या नोटांपैकीं सर्व बँकांमध्यें मिळून फक्त २०० कोटी नोटा रोकड शिल्लक आहेत व राहिलेल्या ९०० कोटींच्या नोटा लोकांच्या घरांत व खिशांत आज पडून आहेत. या सर्व ९०० कोटींच्या नोटा बँकेमध्यें ठेवी म्हणून आल्या असत्या तर या ९०० च्या पांचपट चलन व्यवहारांत आणतां येईल. म्हणजे ४५०० कोटी चलन व्यवहारांत आणण्याचें सामर्थ्य आज बँकांच्या हातांत आहे. आपल्या पंचवार्षिक योजनेस तर फक्त २००० कोटी पाहिजेत. बँकिंग क्षेत्रामध्यें वाढ होण्यास किती वाव आहे हें यावरून आपणांस दिसून येईल. या वाढीचा उपयोग आपण आपल्या देशाच्या योजना, सरकारी कर्जरोखे विकत घेऊन पूर्ण करण्यास बँकांकडून शक्य होईल व आम्हांस पैशाकरितां परक्यांच्या तोंडाकडे न पाहतां आमच्या योजना आम्हींच पार पाडूं शकणें शक्य आहे हें दिसून येईल."

---

## दि सोलापूर डि. सें. को. बँक लि., सोलापूर.

### स्टाफचें स्नेहसंमेलन व प्रदर्शन

सोलापूर डि. सें. को. बँक लि. च्या नोकरवर्गाचें पहिलें स्नेहसंमेलन दि. २३–३–५३ रोजीं झालें. त्यावेळेस श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते व त्यांचें सहकारी चळवळींसंबंधीं उपयुक्त व मार्गदर्शनपर अध्यक्षीय भाषण झालें.

संमेलनाचे निमित्तानें बँकेच्या भव्य दिवाणखान्यांत भरविण्यांत आलेल्या सहकारी चळवळ व बँकिंग प्रदर्शनाचें उद्घाटन मुंबई राज्याचे महसूल व शेतकी खात्याचे मंत्री नामदार श्री. भाऊसाहेब हिरे ह्यांच्या हस्तें झालें व प्रदर्शन पाहून त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

प्रदर्शनांत भारताची पंचवार्षिक योजना, सोलापूर जिल्ह्यांतील संयुक्त शेतकी, मार्केटिंग, शेतकी, औद्योगिक, पाणी पुरवठा, हौसिंग, ग्राहक आदी सोसायट्यांसंबंधींचे सर्वसाधारण माहितीदर्शक तक्ते, हातमागाचें कापड विक्रीसाठीं व बँकिंगचे व्यवहारासंबंधींचे माहितीदर्शक तक्ते, ठेवण्यांत आले होते. प्रदर्शनांतील बँकिंग विभागासाठीं कांहीं उपयुक्त तक्ते पुणें बँकिंग असोसिएशन ह्यांच्याकडून आले होते. प्रदर्शन पाहून सर्वसाधारण जनतेस सहकारी चळवळ वाढविण्याची इच्छा व तिची उपयुक्तता तसेंच बँकिंगच्या व्यवहारासंबंधींची उपयुक्त माहिती मिळाली.

जनतेच्या सोयीसाठीं हें प्रदर्शन ता. ५ पर्यंत उघडें ठेवण्यांत आलें होतें व प्रदर्शन पाहण्यास रोज शहरांतील व आजूबाजूच्या सोसायट्यांच्या सभासदांची गर्दी होत असे.

---

### कोरम मिळविण्यासाठीं गाण्याची बैठक

चांगल्या चाललेल्या बहुतेक संस्थांच्या वार्षिक सभांस आवश्यक त्या कोरमची अडचण भासते आणि पुरेशी गणसंख्या उपस्थित ठेवणें हें चालकांचें एक कामच होऊन बसतें. सभेच्या वेळीं अल्पोपहाराची व्यवस्था करणें, सभासदांना मोटारींतून आणणें–नेणें, वगैरे उपाय योजले जातात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया एम्प्लॉइज असोसिएशनच्या सेक्रेटरीनें ह्याहि पुढें जाऊन, वार्षिक सभेच्या वेळीं सभासदांची गर्दी करून सोडली. उपस्थित सभासदांना कोपऱ्यांतून व जिन्यांतून उभें रहाण्याची पाळी आली. सेक्रेटरीनें सुप्रसिद्ध गायकांचा एक जलसा घडवून आणला आणि त्या जलशाला जोडून वार्षिक सभा घेतली!

### मोटारींसाठी भूमिगत तबेले

लंडनसारख्या मोठमोठ्या शहरांतून मोटारगाड्या ठेवण्याचे तबेले फारच दुर्मिळ झालेले आहेत. लंडनच्या मध्यवर्ती भागांत तबेल्यांची टंचाई विशेषच भासत असते. ही गैरसोय दूर करण्यासाठी काय करतां येईल तें पहाण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें दोन वर्षांपूर्वीं एक कमिटी नेमली होती. कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं लंडन शहरांत भूमिगत मोटारींचे तबेले बांधण्यांत यावेत. ह्या अभिनव योजनेसाठीं ३०,००,००० पौंड खर्च करण्यांत यावयाचे आहेत. भूमिगत तबेले बांधण्याशिवाय इतरहि कांहीं सूचना कमिटीनें केल्या आहेत. ह्या सूचनांवर होणारा खर्च जमेला धरतां मोटारींची सोय करण्याच्या योजनेला एकूण सुमारें १,२०,००,००० पौंड खर्च येणार आहे. एकाहून अधिक मजले असणाऱ्या तबेल्यांच्या इमारतीहि बांधण्यांत याव्या अशी एक सूचना कमिटीनें केली आहे. अशा प्रकारच्या तबेल्यांच्या इमारती बांधण्यांत आल्यास त्या वापरण्यासारख्या स्थितींत राखण्यासाठीं दरवर्षी अंदाजें ५०,००० पौंड खर्च येईल. तथापि, मोटार-मालकांपासून घेण्यांत येणाऱ्या फीच्या रूपानें दरसाल ७४,००० पौंड वसूल होतील असा अंदाज करण्यांत आला आहे. भूमिगत तबेले बांधण्यासाठीं खर्च अधिक येईल ही गोष्ट कमिटीनें मान्य केली आहे. पण अशा प्रकारच्या इमारती युद्धकाळांत सुरक्षित असल्याप्रमाणें वापरतां येणार असल्यामुळें त्यांच्यावर होणारा खर्च अनाठायी झाला असें म्हणणें युक्त होणार नाहीं असा अभिप्राय कमिटीनें व्यक्त केला आहे. भूमिगत तबेल्यांतून सुमारें ३,५४० मोटारगाड्यांची सोय होऊं शकेल आणि एकापेक्षां अधिक मजले असणाऱ्या तबेल्यांच्या इमारतींमधून आणखी ७,२५० मोटारींची सोय होऊं शकेल. लंडनमधील भूमिगत रेल्वेचा युद्धकाळांत आसऱ्यासारखा उपयोग करण्यांत आला होताच.

### प्रवासी काय काय विसरतात

ब्रिटनमधील बस-सर्व्हिसच्या एका मार्गावरील प्रवासी काय काय गोष्टी विसरले त्याची मनोरंजक माहिती प्रसिद्ध झाली आहे. एक प्रवासी स्त्री ६० पौंडांच्या नोटा असलेली मनीबॅग विसरली. कांहीं दिवसांनीं ह्या मार्गावर प्रवास करतांना आपण बॅग विसरल्याचें तिच्या ध्यानांत आलें. हरवलेल्या वस्तूंच्या कचेरींत तपास करण्यासाठीं तिनें आपला एक नातलग पाठविला. बसच्या कंडक्टरनें रकम योग्य अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलेली होती. ती अर्थातच मालकाला परत करण्यांत आली. दुसरा एक प्रवासी बसमध्यें व्हॅक्यूम क्लीनर विसरला. तीन महिन्याचे आंत आपली वस्तू त्यानें परत मागितल्यानें त्याला ती नेहमींच्या नियमाप्रमाणें परत देण्यांत आली. ह्या बसच्या मार्गावर गेल्या सालीं अशा १०,००० वस्तू मालकांनीं हरवल्या होत्या. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, कांहीं लोक आपल्या पायांतील डाव्या पायाचा बूटच घालण्याचे विसरले आणि तो बसमध्यें तसाच ठेवून ते गेले. कांहीं लोक मुलांसाठीं घेतलेल्या बाबा गाड्या विसरून गेले. विसराळूपणा हा प्रवासी लोकांचा एक मनोधर्मच दिसतो. ब्रिटनमधील एका हॉटेलमध्यें एक श्रीमान स्त्री उतरली होती. झोंपतांना तिनें आपला २,००० पौंड किंमतीचा हातांत घालण्याचा एक दागिना उशीखालीं ठेवला होता. सकाळीं ती विमानानें पुढील प्रवासाला निघाली. विमान सुटल्यावर तिला आपला दागिना विसरल्याची आठवण झाली. मँचेस्टरमधील एका बसच्या मार्गावर एक प्राचीन वस्तू सांपडली. किंग सालोमन जें सील ३,००० वर्षांपूर्वी वापरत होता तें एका सिगरेटची राख झाडण्याच्या पेटींत सांपडलें.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाल्वेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ४,००,०००

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.



## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

—पुणें शहर—

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८१

मोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांनीही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्षे २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दरावद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## शेअर्स विक्रींतील नफा करपात्र आहे काय?

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

मेसर्स राजपुताना टेक्सटाइल (एजन्सीज) लि. ची स्थापना ६ एप्रिल, १९४३ रोजीं झाली. तिचें वसूल भांडवल २० लक्ष रु. होतें. कंपनीच्या स्थापनेपूर्वी, उत्पादकांनीं मेसर्स ई. डी. ससून आणि कं. लि.शी करार केला. अपोलो मिल्स लि. ची मॅनेजिंग एजन्सी १२,५०,००० रु.स विकत घेण्याची व अपोलो मिल्सचे १९,७६,००० भाग ८३,९८,००० रुपयांस विकत घेण्याची करारांत अट होती. मॅनेजिंग एजन्सी व शेअर्स विकत घेण्यासाठीं उत्पादकांनीं मेसर्स राजपुताना टेक्सटाइल (एजन्सीज) लि. ही कंपनी नोंदली. त्यानंतर, त्या कंपनीनें अपोलो मिल्सचे १३,७४,००० शेअर्स विकले व त्यांत १६,५२,६०० रु. नफा मिळविला.

इनकमटॅक्स चौकशी कमिशननें ह्या व्यवहाराची छाननी केली व असें ठरविलें कीं, शेअर्सची खरेदी व विक्री हा व्यापारी सौदा होता आणि म्हणून १६,५२,६०० रु. चा नफा करपात्र होता. अशा प्रकारचा व्यवहार कंपनीनें एकदाच केलेला होता आणि तो व्यापारी सौद्याच्या स्वरूपाचा असला (ॲडव्हेन्चर इन दि नेचर ऑफ ट्रेड) तरच करास पात्र ठरतो. एकादा वकील शेअर्स विकत घेईल व विकेल, आणि शेअर्सला किंमत जास्त आली तर त्याची भांडवलांतील वाढ प्रत्यक्ष रोख रकम मिळवील. परंतु, अशी वाढ व नफा ह्यावर कर बसविता येणार नाहीं. कारण, नफ्यासाठी केलेल्या व्यापारी सौद्यांचें ह्या व्यवहाराचें स्वरूप नाहीं. प्रस्तुत कंपनीच्या प्रकरणांत, शेअरबाजारांत व्यवहार करणाऱ्या एकाद्या सराइतासारख्या गोष्टी घडल्या. नोकर नेमले होते, वाटाघाटी केल्या होत्या, किंमती ठरविल्या होत्या, नफा कमाविला होता आणि शेअर्सच्या खरेदी-विक्रीचा धंदा केला तर ज्या गोष्टी कंपनीनें केल्या असत्या त्या सर्व केल्या होत्या. म्हणून एकाद्या फुटकळ व्यवहारांत मिळालेल्या नफ्याचें स्वरूप प्रस्तुत व्यवहाराचें नाहीं. म्हणून प्रस्तुत व्यवहार हा 'ॲडव्हेन्चर इन दि नेचर ऑफ ट्रेड' आहे असें हायकोर्टानें ठरवून कंपनीची १६,५२,६०० रु. प्राप्ति कमिशननें करप्राप्त ठरविली तें योग्य झालें, असा निवाडा केला.

---

**आतां कृत्रिम व्हिटॅमिन्स—** रसायनशाळेंत कृत्रिम व्हिटॅमिन्स तयार करण्याची किमया शास्त्रज्ञांना साध्य झाल्याची वार्ता आहे. हीं पोषक सत्त्वें स्वस्त विकणेंहि शक्य होणार आहे. अशा सत्त्वांचा उपयोग करून तांदुळाची अन्नविषयक उपयुक्तता अतिशय थोड्या खर्चांत चांगलीच वाढवितां येते, असें म्हणतात.

**इजिप्तच्या सरकारचा फायदा—** इजिप्तचे माजी राजे फरूक ह्यांच्या ४६ मोटारी विकून इजिप्तच्या खजिन्यांत २५,००० पौंडांची भर टाकण्यांत आली. त्यांपैकी सर्वांत उत्तम गाडी लिबिआच्या राजाच्या पुतण्यानें घेतली. ह्या गाडींत दोघांना झोपण्याची व्यवस्था असून सिनेमा दाखविण्याचीहि सोय आहे. ह्या गाडीसाठी त्यांना ८०० पौंड मोजावे लागले.

**विटा तयार करण्याचें यंत्र—** कांहीं अमेरिकन आणि इजिप्शिअन तंत्रज्ञांनीं विटा तयार करणारें एक यंत्र बनविलें आहे. हें यंत्र वजनाला हलकें असल्यामुळें एका जागेहून दुसऱ्या जागीं सहज नेतां येतें. इजिप्तमध्यें तयार होणाऱ्या विटा उन्हांतच भाजतात. पण त्या पाण्यानें ढिसूळ होतात. विटा तयार करतांना त्यांत तेल घालून हा दोषहि काढून टाकण्यांत आला आहे.


# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखाः—संकेश्वर, होसूर (पा. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिक्कोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट लौकरच सुरू होत आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एम्. जी. हेरेकर, चेअरमन. ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर. एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

## मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व्ह व फंडस् | रुपये ४,९०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटीवर |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज, इचलकरंजी.

सांगली येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. आर. व्ही. देशमुख, B. A., B. Litt. (Oxon) (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. तात्यासाहेब श्रीमंधर आरवाडे, (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुप्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.